महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:१४७७/रासेमु/२०२०/१७ दिनांक: २७ डिसेंबर, २०२१

**-: घोषणा :-**

**विषय:- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० च्या उत्तरतालिकेवरील हरकती केवळ ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०४ डिसेंबर ते ०६ डिसेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० च्या भाषा पेपर-२ (मराठी व इंग्रजी), सामान्य अध्ययन I, सामान्य अध्ययन II, सामान्य अध्ययन III व सामान्य अध्ययन IV या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या एकूण ५ प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकातील तरतुदीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने प्रोफाईलव्दारे सादर करणे आवश्यक आहे. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक ०३ जानेवारी, २०२२ रोजी २३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

३. विहित ऑनलाईन पध्दतीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. ऑनलाईन पध्दतीने हरकती सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच, support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

ठिकाण : मुंबई.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई